ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.II/Agust 11pp.1-4

Research Paper -History

# 'अजिंक्यतारा' किल्ला व सातारा शहराचा इतिहास

**डॉ. वरेकर निवासराव अधिकराव**
इतिहास विभागप्रमुख,
आदर्श महाविद्यालय, विटा,
श्रीरामनगर मायणी रोड.

### प्रास्ताविक :

हिंदूपद—पादशाहीचे आद्य संस्थापक श्री. शिवाजी महाराज यांनी अतुल पराक्रमाने स्थापन केलेल्या साम्राज्याची एकेकाळी राजधानी म्हणून वैभवाच्या अत्युच्च शिखरावर चढलेल्या व जेथून अत्यंत मुत्सद्देगिरीने सर्व लष्करी, सामाजिक व राजकीय सुत्रे हलवली जात होती; त्या साताऱ्याचा इतिहास म्हणजे एकापरीने अजिंक्यतारा किल्याचाच इतिहास होय. आज नागरी इतिहास ही सध्या ऐतिहासिक संशोधनाची विकसित शाखा असून सर्व जगभरातील संशोधक, इतिहासकार आता वेगवेगळ्या खंडातील शहरे आणि खेड्यांचा उगम आणि विकास यावर संशोधन कार्य करत आहेत. सातारा शहर हे मध्ययुगीन कालखंडात मराठ्यांची राजधानी होती व सध्या जिल्ह्याचे ठिकाण म्हणून सातारा शहराला ओळखले जाते. सातारा शहराच्या विकासामध्ये ऐतिहासिक वारसा या घटकामुळे कशी भर पडली हे दाखवून देणे हा या शोध निबंधाचा हेतू आहे.

### सातारा शहराची भौगोलिक पार्श्वभूमी :

सम्राट अशोकानंतर सतराव्या शतकात छ. राजारामाने अजिंक्यतारा किल्यावर मराठी राज्याची राजधानी बनवली. अजिंक्यतारा किल्याच्या पायथ्याशी सातारा शहर हे वसले पुण्याच्या दक्षिणेस 111 कि.मी. तर कोल्हापूरच्या उत्तरेस 134 कि.मी. अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्र. 4 वरती सातारा हे शहर वसले आहे. भौगोलिकदृष्ट्या 17011'30'' पूर्व रेखांशावर आहे. समुद्रसपाटीपासून या शहराची उंची 679 मीटर असून शहराचे सध्याचे क्षेत्रफळ 8.16 चौ. कि.मी. आहे. प्राकृतिकदृष्ट्या हे शहर सर्व बाजूंनी डोंगररांगांनी वेढलेले आहे. एका बाजूने सह्याद्री पर्वतरांगा व दुसऱ्या बाजूने महादेव डोंगर यांच्या कूशीत हे शहर वसले आहे. सन 2001 च्या जनगणणेनुसार सातारा शहराची लोकसंख्या 108048 एवढी असून शहराच्या हद्दीस लागून असणाऱ्या वसाहतीचे रूपांतर शहरात झाले असून शहराची नागरी लोकसंख्या 169603 एवढी आहे.

### सातारा या शब्दाच्या व्युत्पत्तीचा इतिहास :

सातारा या संज्ञेचे अनेक अर्थ आणि व्युत्पत्ती सांगण्यात येतात. सातदरा, महादरा, सप्ततारा या शब्दांपासून सातारा शब्दाची व्युत्पत्ती झाली असे सांगतात. मूलतः सातारा हे नाव शहराचे नसून ज्या किल्ल्याजवळ त्यांची वसाहत आहे त्या किल्ल्याचे हे नाव आहे. सातारा किल्ल्याची जी नावे उपलब्ध झाली आहेत. ती अशीः मंगलाई, सप्तर्षी, सतारे, उकाबैन, इसमतारा, शाहगड आणि अजिंक्यतारा या सहा नावापैकी पहिली तीन फार जुनी नावे आहेत. उकाबैन, इसमत आरा व अजीमतारा ही नावे गेल्या सहाशे वर्षातील आहेत. तारा म्हणजे किल्ला, साताऱ्याभोवती सात किल्ले आहेत. म्हणून सातत्तारे, सात्तारे असा शब्द झाला. किल्ल्यावर सप्तऋषींचे देऊळ होते. हे सप्तऋषी म्हणजे आकाशातील सात तारे होत. यावरून सात तारे, सात्तारे, सातारा असा शब्द बनला.2 सातारा किल्ल्याचे सतारे नाव शाहूकालीन पत्रव्यवहारात सापडते.3 औरंगजेबचा मुलगा अजीमशहा याने सातारच्या किल्ल्यास वेढा दिला तेव्हा किल्ल्याला सतरा दरवाजे व बुरूज होते. त्यावरून सातारा हे नाव पडले असे म्हणतात. सात सातर म्हणजे विस्तार असा अर्थ निघतो. तर सीतर या विशेषणावरून विस्तार करणारा तो सातारा हे विशेषनाम भाषाशास्त्रीय ठरते. अशा रितीने सात—सातर—सातारा ही संकल्पना सिद्ध होते.

### सातारा शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

सातारा जिल्ह्यावर प्राचीन काळात सम्राट अशोकानंतर सातवाहन, चालूक्य, राष्ट्रकूट, शिलाहार आणि यादवांनी राज्य केले. ''सातारा कूट'' या नावाने प्रसिद्ध पावलेला हा भूभाग यादवांच्या पाडावानंतर बहामनींच्या अधिपत्याखाली आला. सतराव्या शतकात शिवाजीने सातारची भूमी मराठी राजसत्तेचे केंद्र बनवली. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी सातारा ही मराठी राज्याची राजधानी बनविली. अजिंक्यतारा हा इतिहासप्रसिद्ध डोंगरी किल्ला आहे. हा ज्या भूभागावर आहे तो भूभाग इ.स. पूर्व 90 ते इ.स. 300 पर्यंत आंध्रभत्य राजांच्याकडे होता. यानंतरच्या काळात हा प्रदेश कोणत्या राजवंशाकडे होता हे साधने उपलब्ध नसल्याने निश्चित सांगता येत नाही. काही ताम्रपटावरून इ.स. 1200 पर्यंत या प्रदेशावर चालूक्य व राष्ट्रकूट यांचा अंमल होता असे दिसते.4 या किल्ल्यावर कोठेही शिलालेख वगैरे अद्याप सापडलेले नाहीत. हा किल्ला कोल्हापूरचा शिलाहार वंशीय दूसरा भोज, या राजाने इ.स. 1190 च्या सुमारास बांधला व त्याची राजधानी पन्हाळा ही होती.

साताऱ्याचा प्रथम लिखित उल्लेख चौथ्या बहामनी राजा मुहम्मद शाह (इ. स. 1358 — 1365) च्या काळात येत असून त्याने हा किल्ला बहुदा दुरूस्त केला असावा. बहामनी नंतरच्या काळात या किल्ल्यावर अनेक घटना घडल्या. इ.स. 1579 मध्ये विजापूर सरदार किशवरखानाने विजापूरच्या राणी चाँद बिबीवर आरोप ठेवून तिला सातारा किल्ल्यावर कैद करून ठेवले.5 विजापूरच्या ताब्यात असलेला हा किल्ला शिवाजी महाराजांनी 27 जुलै 1673 रोजी आपल्या ताब्यात घेतला.6 कर्नाटक माहिमेच्या आधी शिवाजी महाराज डिसेंबर 1675 व जानेवारी 1676 या काळात आजारी पडले असताना त्यांचा मुक्काम सातारा किल्ल्यावर होता. येथून त्यांनी देशसेवा, अनुष्ठाने व दानधर्म केला. या किल्यास मराठ्यांच्या राजधानीचा मान तसा सर्वप्रथम छ. राजरामने दिला.7 त्याने जून 1698 मध्ये विशाळगडाहून आपली राजधानी साताऱ्याच्या किल्ल्यावर आणली. पुढे दि. 8 डिसेंबर 1699 ते 21 एप्रिल 1700 या काळात औरंगजेबाने किल्ल्यास वेढा देऊन तो काबीज केला. किल्याचा हवालदार प्रयागजी अनंत याने मात्र प्राणपणाने हा किल्ला लढविला होता. परंतु त्यास अपयश आले. औरंगजेबाने किल्ला ताब्यात घेतल्यानंतर तत्काळ किल्ल्याचे नाव 'अजमतारा' असे ठेवले. 8 सन 1706 मध्ये हा किल्ला मराठा प्रतिनिधी परशुराम त्रिंबकने पुन्हा काबीज केला. 9 सातारा गादीवर महाराणी ताराबाईची हुकूमत असताना संभाजी पुत्र शाहूची मुघलांच्या कैदेतून 8 मे 1700 रोजी सुटका झाली. त्याने ताराबाईच्या ताब्यातून हा किल्ला जिंकून घेऊन शुभमुहुर्त पाहून 12 जाने. 1708 रोजी आपला राज्याभिषेक समारंभ या किल्ल्यावर पा पाडला. पुढे शाहूने राज्यकारभारच्या दृष्टीने अजिंक्यतारा किल्ल्यावर राजधानी गैरसोयीची वाटल्याने व आपले आसन स्थिर झाल्यावर किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्याशी शाहूनामक नावाचे गाव वसविले; व हेच गाव सातारा शहर म्हणून ओळखले जाते. शाहू छत्रपतींचे आयुष्य औरंगजेबाच्या छावणीत गेले असल्याने त्यांना सपाट प्रदेशात राहणे आवडे. त्यासाठी त्यांनी किल्ल्याच्या पायथ्याशी शाहूनगर वसविले. त्यांनी या ठिकाणी वस्ती करताना लोकांना उत्तेजन दिले. यवतेश्वरास तलाव बांधून पाणी

आणले, वस्ती वाढली तशी त्याने या वस्तीस, पेठास सात वारांची नावे दिली. शाहूच्या काळात त्याने साताऱ्यात रंगमहालाचा वाडा, जुनावाडा, आदलतवाडा, अक्कलकोटकरांचा वाडा पिंगळ्याचा वाडा, शैख मिरचीवाडा असे वाडे बांधले. रामाउचा गोट, यादोगोपाळ पेठ, व्यंकटपूरा, चिमणपूरा, दुर्गापूरा, पंताचा गोठ, रघूनाथपूरा इ. स्थळे आजही शाहूच्या आदमींची आठवण करून देतात. सारांश सातारा शहराच्या सौंदर्यात शाहूने भर घातली असे दिसून येते. शाहूच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या काळात साताऱ्यात राजकीय कैदी होते. सन 1707 ते 1749 या काळात सातारा हे राष्ट्रीय राजकारणाचे माहेरघर झाले होते. या शहराने माणसे, साहित्य, सेनापती, अधिकारी, दिशा आणि प्रेरणा स्वराज्यांकरीता पुरविली. शाहूच्या मृत्यूनंतर राजकारणाचा एकूण नूरचा पालटला.

सन 1818 साली ब्रिटीशांनी सर्व मराठी राज्य घशात घातले. ब्रिटीशांनी दुसऱ्या बाजीरावाकडून मराठ्यांची सत्ता हिसकावून घेतली व राजा म्हणून प्रतापसिंहास गादीवर बसविले आणि आपला अंमल सुरू केला. मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट, जॉन माल्कम, ग्रँड डफ, कर्नल ब्रीज, रॉबर्टसन व कर्नल लॉडविक इ. कर्तबदार इंग्रज अधिकारी यांनी छत्रपती प्रतापसिंहाच्या कारभाराची सुस्पष्ट वाखाणणी केली आहे. 10 ग्रँड डफ व प्रतापसिंह महाराज यांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थान खूप चांगले केले. सातारा शहर सुधारण्यासाठी प्रतापसिंहाने खूप कष्ट घेतले. राजवाडे, रस्ते, पाणी, फळबागा यासारख्या सुविधा लोकांना उपलब्ध करून दिल्या. म्हणूनच खऱ्या अर्थाने प्रतापसिंह साताऱ्याचे शिल्पकार होते असे संबोधले जाते. मुलामुलींच्या संस्कृत, मराठी व इंग्रजी शिक्षणास्तव एक मोठी पाठशाळेची इमारत बांधली. सन 1848 साली सातारा हे ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आले. प्रतापसिंहानंतर गादीवर आलेल्या राजास औरस संतती नसलेने दत्तक घ्यावा लागला. तथापि दत्तक नामंजूर करून करून इंग्रज सरकारने 16 मे 1849 रोजी सातारा येथे एक जाहीरनामा प्रसिद्ध करून सातारा संस्थान हे खालसा केले. ब्रिटीशांनी सातारा ताब्यात घेतल्यानंतर सर्व प्रकारच्या संस्था उभारल्या. यामध्ये नगरपालिका (1853), कचेरी, शाळा, सरकारी दवाखाना, नगरवाचनालय यांचा समावेश होतो व सध्याचे सदरबझार या ठिकाणी लष्करी छावणीची (कन्टोन्मेंट) स्थापना केली होती. त्यामुळे साताऱ्याला लष्करी शहराचा दर्जा प्राप्त झाला. परंतु पुढे साताऱ्यातील लोकांना नागरी जीवन स्वतंत्रपणे घालवता यावे म्हणून ब्रिटीशांनी सन 1890 साली लष्करी छावणी बरखास्त केली व कॅम्प भाग सातारा नगरपालिकेस जोडला गेला. छावणी रद्द झालेल्या ठिकाणी ब्रिटीशांनी लष्करी शाळा सुरू केली. युगपुरूषाचा वारसा सांगणाऱ्या साताऱ्याने स्वातंत्र्यसंग्रामातही मोलाची कामगिरी केली. शहरातील राष्ट्रप्रेमी संघटना देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आघाडीवर होत्या. इंग्रजांच्या पाशवी शक्तीशी लढणारा सातारा जिद्दीने, स्वाभिमानाने, त्याग भावनेने आणि देशनिष्ठेने स्वातंत्र्यप्रेम व्यक्त करीत होता. सन 1947 ला देश स्वतंत्र झाला. साताराचा अजिंक्यतारा तिरंगी निशाणाचे स्वतंत्र अस्तित्व घेऊन पुन्हा मानाने मिरवू लागला.

### *सातारा शहरातील काही ऐतिहासिक वास्तू :*

सातारा ही मराठ्यांची राजधानी होती हे पटवून देण्यासाठी आजही शहरातील काही वास्तू याची साक्ष देताना दिसतात. यामध्ये –

1) आदलतवाडा 2) रंगमहाल 3) जुना राजवाडा 4) नविन राजवाडा 5) जुने जलमंदिर 6) नविन जलमंदिर 7) चार भिंती 8) आर्थर जलछत्र 9) नगरवाचनालय 10) श्री. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय इ. वास्तूंचा समावेश होतो. अशा प्रकारे सातारा शहराच्या विकासामध्ये ऐतिहासिक घटकांचा परिणाम निश्चित झाला असे आपणाला म्हणता येईल.

### *संदर्भ सूची :*

1) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, सातारा, 1994 पृ. 140.
2) माटे. गो. रा. 'असा घडला सातारा', सातारा 1988 पृ. 4.
3) जोशी, वा. वि. 'सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती', भारतीय
इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक एप्रिल, 1973 पृ. 41.
4) सातारा शहर नगरपालिका 'शतसंवत्सरीक महोत्सवी' अंक 1954 पृ. 1.
5) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा, 1999, पृ. 895
6) सातारा शहर नगरपालिका 'शतसंवत्सरीक महोत्सवी' अंक 1954 पृ. 7.
7) सरदेसाई गो.स. मराठी रियासत, खंड 2, 1989, पृ. 159, 262.
8) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा, 1999, पृ. 575.
9) कित्ता पृ. 161.

### *गोषवारा*

सातारा ही मध्ययुगीन इतिहासाच्या अध्ययनामध्ये मराठ्यांची राजधानी होती. छ. शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीला इतिहासाची विविध अंगे आहेत. ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय क्षेत्राची वैभवशाली परंपरा असलेली ही भूमी वीरांची, शुरांची, क्रांतीवीरांची आहे. राजधानीचे ठिकाण म्हणून मध्ययुगीन कालखंडामध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. ज्या अजिंक्यताराच्या पायथ्याशी सातारा हे शहर वसले आहे; तो अजिंक्यतारा किल्ला म्हणजे इतिहास प्रसिद्ध डोंगरी किल्ला आहे. हा किल्ला कोल्हापूरच्या शिलाहारवंशीय दुसरा राजा भोज याने बांधला. छ. शिवाजी महाराजांनी 27 जूलै 1973 रोजी विजापूरकरांच्याकडून आपल्या ताब्यात घेतला. छ. शिवाजी महाराजांचे वास्तव्य काही काह या किल्ल्यावर होते. सन 1698 साली छ. राजाराम महाराजांचे कारकिर्दीत प्रथम राजधानीचा प्रथम मान मिळाला. तर 1708 मध्ये संभाजीपुत्र शाहू याने अजिंक्यतारा किल्ल्यावर राजधानी गैरसोयीची वाटल्याने किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्याशी शाहू नामक नावाचे शहर वसविले; यालाच आपण हल्लीचे सातारा शहर म्हणून ओळखतो. त्याने अनेक सुविधा पाणी, रस्ते, वाडे, पेठा निर्माण करून गावाला महत्त्व आणले तर प्रतापसिंहांनी पाणी, रस्ते, पाठशाळा यासारख्या मूलभुत गोष्टी आणून शहराच्या सौंदर्यात भर घातली व त्यालाच खऱ्या अर्थाने सातारा शहराचा शिल्पकार असेही म्हटले जाते. पुढे ब्रिटीशंनी सातारा संस्थान 16 मे 1849 ला खालसा केल्यानंतर इथे अनेक शासकीय संस्था उभारून साताऱ्याला प्रमुख प्रशासकीय केंद्र बनविले. त्यामुळे एकापरीने शहराच्या विकासात भरच पडली. युगपुरूषांचा वारसा सांगणाऱ्या साताऱ्याने स्वातंत्र्यसंग्रामातही मोलाची कामगिरी केली. सारांश ऐतिहासिक वारसा लाभल्यामुळे सातारा शहराचा विकास झालेला आपणाला दिसून येतो. आज सातारा हे जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे.